महाराष्ट्र शासन

<u>अत्यंत तातडीचे</u>

क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉप्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
दिनांक- १८ मार्च २०२०

प्रति,

अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव
सर्व मंत्रालयीन विभाग

**विषय: राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत ( वातानुकुलीत यंत्रणांचा वापर कमी करणेबाबत बाबतच्या मार्गदर्शक सूचना)..**

**संदर्भ:** सार्वजनिक आरोग्य विभाग समक्रमांक अधिसूचना दिनांक १३ व १४ मार्च २०२०

करोना विषाणुच्या प्रतिबंधासाठी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून खालील आरोग्य विषयक खबरदारी घेण्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. यात प्रामुख्याने

- श्वसनसंस्थेचे विकार असणाऱ्या व्यक्तींची संपर्क ठेवतांना संसर्ग न होण्याची काळजी घेणे
- शिंकतांना व खोकतांना नाकातोंडावर रुमाल अथवा टिश्यू पेपर धरणे
- हात वारंवार धुणे
- अर्धवट शिजलेले कच्चे मांस न खाणे
- फळे, भाज्या स्वच्छ धुऊन खाणे इत्यादी

या विषाणुचा आजार व प्रसार मुख्यत्वे खोकल्यातून व शिंकण्यातून जे थेंब बाहेर पडतात त्यातूनच मोठया प्रमाणावर पसरत आहे व या आजारात संसर्गाचे प्रमाण खुप जास्त आहे. करोना विषाणुचे शिंकण्या व खोकल्यातून उडालेले थेब हवेतील धुलीकणांसोबत विविध वस्तुंच्या पृष्ठभागावर स्थिरावतात. मध्यवर्ती वातानुकुलन किंवा वातानुकुलीत खोलीमध्ये असे विषाणुमिश्रीत थेंबातील विषाणु जास्त कालावधीकरिता जिवंत राहतात परंतु, योग्य वायुविजन (Ventilation) किंवा तापमान जास्त असलेल्या वातावरणात हे थेंब लवकर सुकल्याने या विषाणुचा जीवन कालावधी कमी होतो व रोग प्रसारणास प्रतिबंध होतो. यास्तव वातानुकुलीत यंत्रणांचा कमितकमी वापर अथवा गरजेपुरताच वापर करुन इतर वेळी शक्यतो दरवाजे, खिडक्या उघडया ठेवून जास्तीत जास्त् वायुविजन होऊ देणे हादेखील एक प्रभावी प्रतिबंधक उपाय आहे.

यास्तव राज्यातील आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना वातानुकुलीत यंत्रणा न वापरणे अथवा गरजेपुरता कमितकमी वापर करण्याबाबतच्या सूचना प्रतिबंधात्मक उपाययोजने आपणाकडून निर्गमित करण्यात याव्यात अशा सूचना सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने देण्यात येत आहेत.

प्रदीप व्यास

**( डॉ. प्रदीप व्यास)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत विभागीय आयुक्त, (सर्व )
प्रत आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

प्रत पोलीस आयुक्त (सर्व)
प्रत जिल्हाधिकारी (सर्व)
प्रत पोलीस अधिक्षक ( सर्व)
प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रत आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई
प्रत संचालक, आरोग्य सेवा मुंबई / पुणे
प्रत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
प्रत मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
प्रत मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
प्रत मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव
प्रत खाजगी सचिव, मा. मंत्री (सा.आ.) मंत्रालय, मुंबई
प्रत खाजगी सचिव, मा. राज्य मंत्री (सा.आ.) मंत्रालय, मुंबई